International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 6 July-Aug 2024

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 समोरील आव्हाने

**प्रा. डॉ गायकवाड एस.एम.**
सहा. प्राध्यापक, मा. ह. महाडीक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.
**Corresponding Author: प्रा. डॉ गायकवाड एस.एम.**
**Email:** subhash25gaikwad@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13335648**

**सारांश:**

नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थी व्यावसायिक कौशल्य आत्मसात करणार आहे त्यामुळे तो नोकरी मागणार नाही नोकरी देणार आहे भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी त्याच्यात विकसित होणार आहे हे धोरण म्हणजे शिक्षणातील क्रांतीचा आराखडाच आहे याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाल्यावर भारत जागतिक दर्जा प्राप्त करणार आहे 34 वर्षानंतर म्हणजे 1986 नंतर असे बहुव्यापक शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले आहे या धोरणामुळे भारतात शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक समस्या किंवा आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे त्या सुचवण्याचा या शोधनिबंधात प्रयत्न केला आहे.

**बिजसंज्ञा:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षणाची रचना, मार्गदर्शनक तत्वे, शिक्षक प्रशिक्षण, व्यावसायिक विकास, आव्हाने.

**प्रस्तावना:**

(NEP) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे शिक्षण क्षेत्रातील सर्वसमावेशक धोरण आहे. या धोरणाचा उद्देश भारतातील शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणे आहे. या शैक्षणिक धोरणाचे सूत्र किंवा शिक्षणाची रचना 5+3+3+4 असे असून भारतातील शालेय शिक्षणाच्या नवीन संरचनेचा हे संदर्भ देते. नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार विद्यार्थ्यांना पायाभूत टप्प्यात 5 वर्षे, तयारीच्या टप्प्यात 3 वर्षे, मधल्या टप्प्यात 3 वर्षे, आणि माध्यमिक टप्प्यात चार वर्षे अशा पद्धतीने शिक्षण घ्यावे लागेल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 29 जुलै 2020 मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली असल्याने यास NEP 2020 म्हणतात. सदरील संशोधन पेपर लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय सोलापूर शिक्षण शास्त्र विभागाने आयोजित केलेल्या सेमिनार मध्ये सादर करण्यासाठी तयार केला.

**अभ्यासाचे उद्दिष्ट्ये:**

1. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करणे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
3. नवीन शैक्षणिक धोरण 2020 चे महत्त्व अभ्यासणे.
4. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

1. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा अभ्यास करणे.
2. सध्याचे शैक्षणिक धोरण कालबाह्य झाले आहे.
3. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती:**

सदरील संशोधन पेपर प्राथमिक व द्वितीय स्वरूपाच्या माहिती स्त्रोताचा आधार घेऊन तयार केला आहे. "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020." द्वितीयक माहिती स्त्रोत आमच्या विविध मासिक, वर्तमानपत्र, संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, आंतरजाल मधुन माहितीचे संकलन केले आहे. या माहितीचा उपयोग करून विषय विवेचन व विश्लेषण केले आहे.

**विषय विवेचन:**

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे स्वरूप:-** नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षणाची रचना

**१. पायाभूत स्तर पाच वर्षे (वय ३-८):** तीन वर्षे (अंगणवाडी/ पूर्व प्राथमिक शाळा /बालवाडी) वय ३ ते ६, २ वर्षे (इयत्ता पहिली व दुसरी) (वय ६ ते ८):- हा टप्पा लहान मुलांना संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि

सर्जनशील कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करून खेळावर आधारित आणि क्रियाकलापआधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल.

**२. पूर्वाध्ययन स्तर ३ वर्षे (वय ८-११) (इयत्ता ३-५):-** हा टप्पा प्रकल्पावर आधारित आणि अनुभवात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल. ज्यात गंभीर विचार, समस्या सोडवणे आणि संवाद कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

**३. पूर्व माध्यमिक स्तर ३ वर्षे (वय ११-१४)(इयत्ता ६-८):-** हा टप्पा विषय-आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करणार आहे. ज्यात संकल्पनात्मक समज आणि विश्लेषणात्मक कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

**४. माध्यमिक स्तर ४ वर्षे (वय१४-१८) (इयत्ता ९-१२):-** हा टप्पा बहुविद्याशाखीय अभ्यासावर लक्ष केंद्रित करणार आहे जात व्यवसायिक आणि शैक्षणिक कौशल्य विकसित करण्यावर भर देणारा आहे.

एकंदरीत NEP 2020 चे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून अधिक लवचिक आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली निर्माण करणे आहे. या धोरणात शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण आणि विकास आणि बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्याचे आहे.

**NEP 2020 ची मार्गदर्शक तत्वे:**

**१. समग्र आणि बहुविद्याशाखीय शिक्षण:-** नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांना सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण देण्यावर भर देणारे आहेत विशेष म्हणजे पाठ्यपुस्तकीय शिक्षणाच्या पुढचे आहेत त्यांच्या संज्ञानात्मक सामाजिक भावनिक आणि शारीरिक विकासाला चालना देणारे आहे.

**२. लवचिकता आणि निवड :-** NEP 2020 हे धोरण लवचिक अभ्यासक्रम प्रदान करणाऱ्या आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी व अभिरुचीनुसार अभ्यासक्रम निवडण्याची परवानगी देते. विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीनुसार शिक्षण घेण्यासाठी क्रेडिट आधारित प्रणाली प्रदान करते.

**३. तंत्रज्ञानावर भर:-** शिक्षणातील तंत्रज्ञानाच्या गतिमानतेची क्षमता ओळखून अध्यापन आणि शिक्षण, शैक्षणिक प्रशासन व प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे परवानगी देणारे हे धोरण आहे.

**४. सार्वत्रिक प्रवेश आणि समानता :-** सामाजिक-आर्थिक परिस्थिती किंवा भौगोलिक स्थानाचा विचार न करता सर्वांसाठी दर्जेदार शिक्षणाचा सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. तसेच शिक्षणातील लिंग आणि सामाजिक अंतर दूर करण्याचेही उद्दिष्ट आहे.

**५. गुणवत्ता आणि उत्तरदायित्व:-** हे धोरण शिक्षणातील गुणवत्तेला महत्त्व देते, जात अध्यापन, शिकणे व मूल्यांकन यांचा समावेश होतो. डेटाचा वापर आणि पुराव्यावर आधारित धोरण निर्मिती यांच्या शैक्षणिक प्रणालीत अधिक जबाबदारीचे समर्थन करणारे आहे.

**६. शिक्षक व्यावसायिक विकास:-** या धोरणात शिक्षणातील शिक्षकांची महत्त्वाची भूमिका ओळखून व शिक्षकांच्या सतत व्यावसायिक विकासाच्या आवश्यकतेवर भर दिले आहे.

**७. संशोधन आणि नवोपक्रम: -** या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण क्षेत्रातील संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान (NRF) ची स्थापना करण्यात आली परिणामी शिक्षणातील संशोधन आणि नवोपक्रममाला महत्त्व प्राप्त होणार आहे.

सारांश, नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे सर्वार्थाने प्रवेश योग्य व न्याय शिक्षणासाठी सर्वांगीण लवचिक आणि तंत्रज्ञानसक्षम दृष्टिकोनाला चालना देऊन भारतातील शिक्षणामध्ये परिवर्तन करण्यासाठी तयार करण्यात आले आहे ते शिक्षणातील गुणवत्ता उत्तरदायित्व आणि संशोधनाचे महत्त्व तसेच सर्व विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षक व्यावसायिक विकासामध्ये गुंतवणूक करण्याच्या गरजेवर भर देणारे धोरण आहे. (खाजगीकरण)

**NEP 2020 चे उद्दिष्ट:**

शिक्षक प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकास:- अध्यापन व अध्ययनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकास कार्यक्रमांच्या गरजेवर भर दिले आहे या प्रशिक्षण कार्यक्रमात तंत्रज्ञानाच्या एकात्मतेला प्रोत्साहन देणे हे याचे उद्दिष्ट आहे. NEP 2020 मुळे भारतातील शिक्षण क्षेत्रात परिवर्तन आणि एकविसाव्या शतकातील ते अधिक कार्यक्षम आणि सर्वसमावेशक बनविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे व गतीने परिवर्तन होणाऱ्या जगात यशस्वी होण्यासाठी

त्यांना आवश्यक कौशल्य आणि ज्ञान देण्याचे उद्दिष्ट या धोरणात आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे (NEP 2020) फायदे आणि तोटे किंवा आव्हान:**

NEP 2020 हे एक सर्वसमावेशक धोरण असून भारतातील शिक्षणाच्या भविष्याच्या दृष्टीने तयार केले आहे कोणत्याही गोष्टीच्या अनुकूल आणि प्रतिकूल बाबी असतात ते तपासून पाहणे महत्त्वाचे आहे. त्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक धोरणाचे काही फायदे व त्यापुढील आव्हाने कोणती आहेत याचे अवलोकन करू.

**फायदे:**

**१) सर्वांगीण विकास:-** या धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देण्यात आले आहे. जात सज्ञानात्मक, भावनिक, सामाजिक आणि शारीरिक विकासाचा समावेश होतो.

**२) लवचिक अभ्यासक्रम:-** या धोरणामुळे अभ्यासक्रमात लवचिकता असणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी व अभिरुचीनुसार विषय निवडता येणार आहेत.

**३) बहुविद्याशाखीय शिक्षण:-** हे धोरण बहुविद्याशाकीय शिक्षणास परवानगी देते. अर्थात विद्यार्थी विविध विषय आणि शाखेचे अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात.

**४) तंत्रज्ञानावर भर:-** शिक्षणातील आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने विचारात घेऊन अध्यापन व अध्ययनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे समर्थन केले आहे.

**५) शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण:-** पूर्व प्राथमिक शाळा ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सार्वजनिक प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे उद्दिष्ट या धोरणाचे आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 पुढील आव्हाने/ तोटे:-**

नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून अधिक लवचिक व सर्व समावेशक शिक्षण प्रणाली निर्माण करणारे आहे या धोरणात शिक्षण शिक्षक प्रशिक्षण आणि विकास बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला आहे तरीपण या शैक्षणिक धोरणाचे काही दोष किंवा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समोर काही आव्हाने आहेत ते पुढील प्रमाणे.

**१) भाषेची समस्या:-** या धोरणात किमान इयत्ता पाचवी पर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. जे विद्यार्थी त्या भाषेची ओळख नसणाऱ्या आहेत त्यांच्या दृष्टीने ही एक मोठी समस्या आहे.

**२) निधीची कमतरता:-** या संदर्भात के. कस्तुरीरंगन म्हणतात, भारताच्या शिक्षण व्यवस्थेत निधीची कमतरता आहे. सध्या शिक्षण आणि आरोग्यावर बजेटच्या 4.5% खर्च केला जातो संपूर्ण व्यवस्था नोकरशाहीवर आधारलेले आहे. नवीन कल्पना व वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पायाभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण आणि संशोधनात गुंतवणूक महत्त्वाचे आहे. यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. हे सरकार समोरील एक मोठे आव्हान आहे.

**३) एकत्रीकरण:-** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश देशातील शिक्षणाचे प्रमाणिकीकरण (एकत्रीकरण/एकसमान) करणे आहे. ज्यामुळे संस्कृती आणि विविधतेचे एक संधीकरण होऊ शकेल पण हे एक आव्हानच आहे.

**४) शिक्षणातील असमानता:-** ग्रामीण आणि नागरी शिक्षणामधील दरी कमी करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पण संसाधने व पायाभूत सुविधा मधील असमानता विचारात घेता हे अशक्य आहे. म्हणून नवीन शैक्षणिक धोरणासमोर संपूर्ण भारतात एकसमान शिक्षण प्रणाली निर्माण करणे हे एक आव्हानच आहे.

सारांश, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे विभिन्न फायदे आहेत त्यामुळे भारतातील शिक्षणात अमुलाग्र बदल घडू शकेल परंतु या धोरणाच्या अंमलबजावणी समोर काही आव्हाने आहेत ते प्रभावीपणे सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने प्रभावीपणे या धोरणाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:**

१) २१ व्या शतकातील आव्हाने पेलण्याची ताकद नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहे.

२) नवीन शैक्षणिक धोरण भारताला जगातील आघाडीच्या देशापैकी एक महत्त्वाचा देश बनवेल.

३) या धोरणाचा उद्देश सर्व विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्याचा आहे.

४) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 म्हणजे प्रगत भारताच्या उदयाची पहाट होय.

५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे प्रवेश समानता, गुणवत्ता परवडणारी क्षमता आणि जबाबदारी या मार्गदर्शक तत्वावर अवलंबून आहे.

६) भारत हा विस्तृत ग्रामीण भागाच्या देश आहे. भारतात प्रचंड विविधता आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणासमोरील आव्हानांची किंवा समस्यांची सोडवणूक करून भारतातील शिक्षणात परिवर्तन घडविण्यासाठी त्याची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ:**


1. www.maharashtratimes.com
2. www.education.gov.in
3. www.shikshanmitra.com/2021/09
4. डॉ. प्रीती पाटील, शिक्षणातील विचार प्रवाह, फडके प्रकाशन, कोल्हापूर. 2005
5. नागमोडे, किरण - शालेय व्यवस्थापन, शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह - विद्या प्रकाशन, नागपूर.
6. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय भारत सरकार अहवाल.